गृह विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २८ ऑक्टोबर २००३

सर्व जिल्हाधिकारी.

विषय :- मोटार वाहन विभागाचे व राज्य उत्पादन शुल्क विभागाची वाहने अधिग्रहित न करण्याबाबत.

निवडणुकीच्या कामासाठी नेहमी मोटार वाहनांची कामासाठी शासकीय कार्यालयातील वाहन अधिग्रहित करण्यात येतात. तसेच या कामासाठी शासकीय, निमशासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या सेवाही घेण्यात येतात.

२. मोटार वाहन विभाग व राज्य उत्पादन शुल्क विभाग या दोन्ही विभागातर्फे शासनाला दररोज महसूल मिळतो. हे दोन्ही विभाग अंमलबजावणीचे काम करीत असतात. या विभागात असलेली वाहने बाबींच्या तपासणीसाठी वापरण्यात येतात. ही वाहने अधिग्रहित केल्यास संपूर्ण अंमलबजावणी होणारे महसूल वसुलीचे काम ठप्प होते. परिणामी शासनाचेही नुकसान होते. तसेच या विभागातील कर्मचाऱ्यांकडील महसूल वसुलीचे काम करीत असतात. त्यामुळे त्यांच्याही सेवा जर वरील कामासाठी घेण्यात आल्या तर महसूल वसुलीवर परिणाम होतो.

३. वरील पार्श्वभूमी लक्षात घेता आपणास विनंती आहे की, मोटार वाहन विभागाची तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाची वाहने कृपया अधिग्रहित करु नयेत. तसेच या कामासाठी मोटार वाहन विभाग व राज्य उत्पादन शुल्क विभागातील कर्मचाऱ्यांच्या सेवा घेण्याबाबत शेवटचा प्राधान्यक्रम ठेवण्यात यावा ही विनंती.

आपला,

( राजीव सिन्हा )
प्रधान सचिव (परिवहन व राज्य उत्पादन शुल्क)

प्रत :-

१) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

यांना माहितीसाठी.

आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क महाराष्ट्र राज्य मुंबई
दिनांक - 6 NOV 2003